# <u>वसई विरार शहर महानगरपालिका</u>

## मा. सर्वसाधारण सभा दिनांक १९/१२/२०१६

## सायं ४.३० वा.

<table>
<tr><th>अनु. क्र.</th><th>विषयाचे नाव</th><th>मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय</th></tr>
<tr><td>१</td><td>मागील मा. सर्वसाधारण सभा दि.१८/११/२०१६ रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.</td><td>मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १८/११/२०१६ रोजीचे कायम केलेले इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहेत.<br>अनुमोदक :- (पंकज ठाकूर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर.</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रश्नोत्तरे</td><td>प्रश्नोत्तरे हा विषय या सभेसाठी निरंक आहे.</td></tr>
<tr><td>३</td><td>शासकिय पत्रव्यवहार माहितीस्तव</td><td>
<table>
<tr><th>अ. क्र</th><th>सभा दिनांक</th><th>कोणत्या विभागाकडून प्राप्त</th><th>पत्रातील दिनांक</th><th>विषय</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>१</td><td>१९/१२/२०१६</td><td>राज्यनिवडणूक आयोगयांचे क्र.रानिआ/रापनो/प्र.क्र.३२/का-११</td><td>११/११/२०१६</td><td>नोंदणी रद्द झालेल्या राजकीय पक्षांना त्यांच्या नावाने नोंदणी पुर्ववत करण्यासाठी शेवटची संधी उपलब्ध करून देणेबाबत. दि. १५/१२/२०१६ ते ३१/१२/२०१६</td><td>---</td></tr>
<tr><td>२</td><td>१९/१२/२०१६</td><td>राज्य निवडणूक आयोगयांचे क्र.रानिआ/२०१६/प्र.क्र.१३/का.सं.कक्ष,</td><td>२५/१०/२०१६</td><td>उमेदवारांच्या व राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चाबाबत विवरण पत्रे व शपथ पत्रे यांचे विहीत नमुने</td><td>---</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | <table><tr><td>३.</td><td>१९/१२/२०१६</td><td>राज्य निवडणूक आयोग यांचे क्र.रानिआ/रापनो-२०१६/प्र.क्र.४/का-११</td><td>२०/१०/२०१६</td><td>राजकीय पक्ष नोंदणी आदेश, २००९ (सुधारीत-२०१६) सार्वत्रिक निवडणूका-राजकीय पक्षाने सादर करावयाचे अहवाल, विवरणपत्रे इ.बाबत.</td><td>---</td></tr></table><br>**ठराव :-** |
| ४ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती आय वसई आस्थापनेवरील कर्मचारी श्री. सुनिल भिकाजी पवार, सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्री.सुनिल भिकाजी पवार, सफाई कामगार यांनी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्ती मिळणेबाबत विनंती केली आहे. श्री.सुनिल भिकाजी पवार यांची २० वर्षाची अर्हताकारी सेवा पुर्ण झाली असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६६(१) नुसार त्यांची स्वेच्छानिवृत्तीची नोटीस स्विकारुन नोटीसीस तीन महिने पुर्ण झालेनंतर दिनांक १७/०१/२०१७ रोजी मध्यान्होत्तर त्यांना महानगरपालिका सेवेतुन स्वेच्छानिवृत्त करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच श्री.सुनिल भिकाजी पवार यांना स्वेच्छानिवृत्तीनंतरचे देय असलेले अनुषंगिक लाभ अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रविण शेट्टी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५ | श्री. शांतीलाल छोटाभाई सोलंकी, सफाई कामगार, प्रभाग समिती एच, नवघर माणिकपूर यांची वारस सुन श्रीमती दिपमाला विजय सोलंकी यांस वारसा हक्क पद्धतीने महानगरपालिका सेवेत सामावून घेणेबाबत. | **ठराव / निर्णय :-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सफाई-२०१५/ प्र.क्र.२६८/ महामंडळे, दिनांक ११/०३/२०१६ नुसार लाड समितीचे शिफारसीनुसार वारसा हक्क पध्दतीने श्री. शांतीलाल छोटाभाई सोलंकी यांची वारस सुन श्रीमती दिपमाला विजय सोलंकी यांस महानगरपालिकेच्या सेवेत "सफाई कामगार" या पदावर नियुक्ती देण्यास आजची ही महासभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६ | कै. प्रल्हाद शांतु लाड, सफाई कामगार, प्रभाग समिती यांचा वारसा मुलगा श्री. राकेश प्रल्हाद लाड यांस वारस हक्क पद्धतीने महानगरपालिका सेवेत समावून घेणे. | **ठराव / निर्णय :-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सफाई-२०१५/ प्र.क्र.२६८/ महामंडळे, दिनांक ११/०३/२०१६ नुसार लाड समितीचे शिफारसीनुसार वारसा हक्क पध्दतीने कै. प्रल्हाद शांतु लाड यांच्या वारस मुलास कु. राकेश प्रल्हाद लाड यांस महानगरपालिकेच्या सेवेत "सफाई कामगार" या पदावर नियुक्ती देण्यास आजची ही महासभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (कांता पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ७ | श्री. गोपाल तुकाराम पाटील, सफाई कामगार, प्रभाग समिती (सी), चंदनसार यांचा वारस मुलगा कु. प्रसाद गोपाल पाटील यास वारसा हक्काने पद्धतीने महानगरपालिका सेवेत समावून घेणे. | <u>**ठराव / निर्णय**</u> **:-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सफाई-२०१५/ प्र.क्र.२६८/ महामंडळे, दिनांक ११/०३/२०१६ नुसार लाड समितीचे शिफारसीनुसार वारसा हक्क पध्दतीने श्री. गोपाळ तुकाराम पाटील यांच्या वारस मुलास कु. प्रसाद गोपाळ पाटील यांस महानगरपालिकेच्या सेवेत "सफाई कामगार" या पदावर नियुक्ती देण्यास आजची ही महासभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८ | मती सुजाता शिवराम पवार यांना लाड समिती शिफारशीनुसार सफाई कामगार या पदावर महानगरपालिका सेवेत समावुन घेणे बाबत. | <u>**ठराव / निर्णय**</u> **:-** मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०/०१/२०१६, ठराव क्र.०६ मध्ये मा.सर्वसाधारणसभा , दिनांक २०/०२/२०१६, ठराव क्र.०१ मागील सभेचे इतिवृत्त सुधारणा करुन केलेला सुधारित ठराव क्र. १ -अ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील दिनांक १० नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.१७ नुसार पती व पत्नी दोघेही सफाई कामगार कर्मचारी शासकिय अथवा निमशासकिय सेवेत असल्यास व त्यांनी त्यांच्या सेवानिवृत्तिनंतर, स्वेच्छानिवत्तीनंतर अथवा शासन सेवा पुर्ण करण्यास वैद्यकियदृष्ट्या त्यांना अपात्र ठरविल्यानंतर दोघांपैकी फक्त एका कामगाराच्या/ कर्मचा-यांच्या वारसास वारसा पध्दतीने नोकरीचा लाभ द्यावा. दोघांना त्यांचा लाभ देता येणार नाही, अशी तरतुद असल्याने वासंती पवार यांचे पती शिवराम पवार यांचे जागी त्यांचे जावयास वारसाहक्काचा लाभ दिल्याने, आता वासंती पवार यांचे जागी त्यांचे मुलीस वारसाहक्काचा लाभ देता येणार नाही , याबाबत निर्णय घेतलेला होता. तथापि त्यानंतर दिनांक ११ मार्च, २०१६ शासन निर्णयान्वये दिनांक १० नोव्हेंबर, २०१५ या शासन निर्णय रद्द केला आहे. त्यामुळे आता दिनांक २१ ऑक्टोबर, २०११ च्या शासन परिपत्रकातील निर्देशानुसार एकाच कुटुंबातील दोघांना वारसा हक्क पद्धतीने नोकरी देणे शक्य आहे. सबब मा.सर्वसाधारणसभा, दिनांक २०/०१/२०१६, ठराव क्र.०६ मध्ये मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०/०२/२०१६, ठराव क्र.०१ अन्वये घेतलेला निर्णय रद्द करणेंत येत आहे. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्रीमती वासंती शिवराम पवार या दिनांक २५/०३/२०१५ पासून महानगरपालिका सेवेतून रुग्णता निवृत्त झालेल्या असुन त्यांची अविवाहित मुलगी श्रीमती सुजाता शिवराम पवार (वय ३३ वर्षे) या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार श्रीमती वासंती शिवराम पवार यांचे रिक्त जागी वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार"या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (रुपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |

| | | |
|---|---|---|
| | | **ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९ | सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता महिला व मुलींना व्यवसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणेबाबत. | **निर्णय :- महिला व बालकल्याण ठराव गोषवाऱ्या नमुद केल्याप्रमाणे प्रशिक्षण क्र.४,६,९,१० इत्यादी विषयांची प्रशिक्षणे रद्द करुन** त्या प्रशिक्षणा ऐवजी १) शॅाट हॅण्ड टायपिंग (लघुलेखन) २) बॅग मेकींग या दोन विषयाचे प्रशिक्षण घेण्यात यावे.व विषय क्र.१७ मध्ये बदल करुन त्यामध्ये अन्नप्रक्रिया भाज्या फळे मसाले ,लोणचे, पापड इत्यादी पदार्थ टिकविण्याचे प्रशिक्षण देणे बाबत एकुण ५गटामध्ये विभागणी करुन प्रत्येक गटाच्या प्रशिक्षणा करिता १ महिन्याच्या कालावधीची मुदत देण्यात यावी. शॅाट हॅण्ड टायपिंग हया ऐवजी फक्त शॅाट हॅण्ड (लघुलेखन) तसेच आवश्यकते नुसार ठराविक विषयाच्या प्रशिक्षणाचा कालावधी कमी जास्त बदल करण्यात यावा. याकरिता गोषवा-यातल्या प्रशिक्षणाच्या यादीत रद्द करण्यात आलेली प्रशिक्षणाच्या जागेवर नव्याने सुचित केलेल्या प्रशिक्षणाची नावे यादीत समाविष्ठ करुन नविन यादी मा. महासभेच्या गोषवा-यात समाविष्ठ करण्यात यावी. तसेच याकरिता प्रत्येक विषयाकरिता स्वतंत्र इ निविदा फॅार्म प्रक्रिया तयार करुन शासकीय निमशासकीय खाजगी व वैयक्तीक प्रशिक्षण सस्था तसेच इच्छुक ठेकेदार यांच्या कडुन इ निविदा दरपत्रके मागविण्यात यावी. एका कुटुंबातील दोन लाभार्थ्याना या प्रशिक्षणाचा लाभ देण्यात यावा.तसेच एका विषयाशी निगडीत असल्या दुसरा विषय असे एकुण दोन विषयाचे प्रशिक्षण एका लाभार्थ्याला देण्यात यावे. उदा. १) बेसीक संगणक व एम.एस.सी.आय.टी. किंवा टॅली २) शिवणकाम व फॅशनडिझायनिंग ३) मेहेंदी ब्युटिशियन व इमिटेशन ज्वेलरी ४) केटरींग,बेकरी,अन्नप्रक्रिया व लघुउदयोग ५) कराटे व रोपवाटीका ६) इंटरनेट मार्केटिंग) पडिजिटल मार्केटिंग (ऑनलाईन बॅग मेकींग ७) कॉम्पूटर टायपिंग (मराठी व इंग्लिश) प्रशिक्षण व शॅाट हॅण्ड (लघुलेखन ) असे प्रशिक्षण देण्यात यावे.या करीता महिला व बालकल्याण विभागा मार्फत नोंदणी / प्रवेश फॅार्म तयार करण्या यावे. याकामी एकूण १५ विषयांच्या प्रशिक्षणा करिता अदांजे येणा-या १,५३,००,०००/- रुपयांच्या खर्चास सर्वानुमते प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देण्यात देत आहे.<br>**अनुमोदक :- (भारती देशमुख) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १० | नागरी दलित वस्ती सुधारणा योजना (सन २०१६-१७) कामांस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणे. | **प्रस्तावाचा निर्णय :-** सदर योजने अंतर्गत वरीलप्रमाणे कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेंत येत असून मंजूर अनुदाना व्यतिरीक्त होणारा खर्च म.न.पा. फंडातुन करण्यास ही सभा मान्यता देत आहे व सदर कामांच्या ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे निविदा मागविण्यांत याव्यात असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- (रुपेश जाधव ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ११ | वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दितील मौजे-गास, दिवाणमान, चुळणे, गिरीज व आचोळे येथील मिठागर (salt pan) च्या शासकीय जागेवर विविध प्रयोजनार्थ आरक्षणे प्रस्तावित करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना_अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये केलेल्या कार्यवाहीस अंतिम मान्यता मिळणेबाबत. | **ठराव /निर्णयः-**<br>याकामी मंजूर विकास आराखडयामध्ये (नकाशा क्र. MOD No.४/२०१५-१६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) खालील काही नविन बाबींचा अंतर्भाव करुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये केलेल्या कार्यवाहीनुसार प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविणेकामी तसेच त्यासाठी अंमलबजावणी व भूसंपादन करणारे समूचित प्राधिकरण म्हणुन वसई-विरार शहर महानगरपालिका करणेसाठी हि सभा अंतिम मान्यता देत आहे. तसेच याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यांत येत आहे.<br>वरिल प्रस्तावामध्ये नमुद केलेली १)आरोग्य सेवा विषयक कार्यक्रम (Health Care Activity) २) शैक्षणिक कार्यक्रम (Education Activity) ३) क्रिडा कार्यक्रम (Sport Activity) ४) संशोधन व विकास कार्यक्रम (Research & Development Activity) ५) पर्यटन विषयक |

| | | |
|---|---|---|
| | | कार्यक्रम (MICE Tourism Activitiy) ६) बगिचे, मत्सालय व इतर मनोरंजनात्मक कार्यक्रम (Gardens, aquarium & recreational Activity) ७) माहिती व तंत्रज्ञान सेवा इत्यादी (IT & ITES Park etc) हि नविन आरक्षणे मंजूर विकास आराखडयामध्ये प्रस्तावित करण्यासाठी मंजूर विकास आरखडयामध्ये विशेष विकास क्षेत्र (Special Development Zone) प्रस्तावित करणे (नकाशा क्र. MOD No.८/२०१५-१६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) व मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सदर विशेष विकास क्षेत्रासाठी (Special Development Zone) विकास क्षेत्र म्हणुन तरतुद ठेवणे.<br>तसेच सदर विशेष विकास क्षेत्रालगत असलेल्या मौजे-आचोळे येथिल रेल्वे लाईनच्या पश्चिम बाजुला लागुन आरक्षण क्र.४०६ पासून मौजे-दिवाणमान येथिल स.नं-५७ व ५८ पर्यंत १२ मीटर (नकाशा क्र. MOD No.८/२०१५-१६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) रुंदीचा रस्ता प्रस्तावित करणे.<br>**अनुमोदक :- (नितीन राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| **१२** | घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाअंतर्गत मंजुर रक्कमेतुन खरेदी करण्यात आलेल्या ११६०० नग २४० लीटर क्षमतेच्या Wheeled HDPE Bins with lid या बार्बीसाठी मंजुर असलेल्या शिल्लक रक्कमेतुन अधिकची २७३९ नग २४० लीटर क्षमतेच्या Wheeled HDPE Bins with lid मंजुर निविदाधारक मे. निलकमल लि. यांचेकडून निविदेतील मंजुर दरांने मागविणेस मंजुरी मिळणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय :-** सदरचा विषय स्थायी समितीच्या विषय पत्रिकेतील आहे. तो मा. सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेत समाविष्ट झाल्याने सन्मा. महापौर महोदया यांच्या निर्देशावरुन तो आजच्या मा.सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रितेवरुन मागे घेण्यास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (किशोर ग.पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |